आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

दिनांक : 10.11.2026 **वार : सोमवार**

---

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाबाबत, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की यांच्याशी केली चर्चा
2. रशिया आणि युक्रेन दरम्यानच्या भू-राजकीय संघर्षाबाबत आजपासून आबू-धाबीत त्रिपक्षीय बैठकीला सुरुवात
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते गुजरातमध्ये चौदाशे कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विकासकामांचं उद्घाटन आणि पायाभरणी
4. दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय महिला क्रिकेट संघाची घोषणा; स्मृति मांधानाकडे नेतृत्वाची धुरा आणि
5. भारत आणि न्यूझीलंड दरम्यानच्या तिसऱ्या एक दिवसीय सामन्यात पावसामुळे व्यत्यय

<u>पंतप्रधान-रशिया युक्रेन संघर्ष</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल रशिया आणि युक्रेन यांच्यातील संघर्षाबाबत, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोदीमीर झेलेन्स्की यांच्याशी दूरध्वनीवरुन चर्चा केली. या चर्चेदरम्यान, झेलेन्स्की यांनी सध्या सुरू असलेल्या संघर्षाशी संबंधित ताज्या घडामोडींबाबत आपली मतं मांडली. या संभाषणादरम्यान, पंतप्रधानांनी भारताच्या मानव-केंद्रित दृष्टिकोनाला दुजोरा दिला आणि हा संघर्ष, संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवला पाहिजे, या भारताच्या सातत्यपूर्ण भूमिकेचा पुनरुच्चार केला. उभय देशांतील संघर्ष थांबवण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करायला भारत तयार असल्याचं आश्वासन पंतप्रधानांनी यावेळी दिलं. दोन्ही नेत्यांनी, उभय देशांतील लोकांच्या परस्पर फायद्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये भारत-युक्रेन द्विपक्षीय सहकार्य अधिक बळकट करण्याच्या उपाययोजनांवर देखील चर्चा केली.

<u>रशिया-युक्रेन संघर्ष चर्चा</u>

संयुक्त अरब अमिरातीची राजधानी, अबूधाबीत आजपासून रशिया आणि युक्रेन दरम्यानच्या भू-राजकीय संघर्षाबाबत त्रिपक्षीय बैठक सुरू होत आहे. या बैठकीत रशिया आणि युक्रेनसह अमेरिकेचं प्रतिनिधिमंडळदेखील सहभागी होणार आहे. युद्धविराम देखरेख, प्रादेशिक वाद आणि युद्धोत्तर सुरक्षेची हमी यावर लक्ष केंद्रित करून शांतता कराराच्या दिशेने, अमेरिका या बैठकीत प्रयत्न करणार आहे. रशिया आणि युक्रेनमधील संघर्ष गेल्या पाच वर्षांपासून सुरू आहे.

<u>अमली पदार्थ मुक्त</u>

अंमली पदार्थांचं संकट दूर करण्यासाठी केवळ सरकारचे प्रयत्न पुरेसे नसून जनतेचा सक्रिय सहभागही आवश्यक आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. गुजरातमध्ये विविध विकासकामांचं उद्घाटन

केल्यानंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अंमली पदार्थांच्या गैरवापरासंदर्भातील माहिती नागरिकांनी विशेष हेल्पलाइनद्वारे संबंधित यंत्रणांना द्यावी, असं त्यांनी सांगितलं. संपूर्ण देशाला 31 डिसेंबर 2029 पर्यंत अंमली पदार्थमुक्त करण्याचं उद्दिष्ट सरकारनं निश्चित केलं असून, गुजरातमधील नागरिकांनी 31 डिसेंबर 2028 पूर्वीच राज्य अंमली पदार्थ मुक्त करण्याचे लक्ष्य साध्य करण्याचं आवाहन त्यांनी केलं. अंमली पदार्थांचं सेवन तरुणांचं आरोग्य आणि भविष्य धोक्यात आणत असून, या संकटाविरोधात शिक्षक, पालक आणि नागरिकांनी सतर्क राहण्याची गरज असल्याचंही अमित शाह यांनी अधोरेखित केलं.

भारत-फ्रान्स संवाद

अंतराळ क्षेत्रातील तिसरा भारत-फ्रान्स सामरिक संवाद, तसंच, 'आर्थिक सुरक्षा आणि महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान' या विषयावरील संवादाच्या पहिल्या फेरीत सहभागी होण्यासाठी परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री काल पॅरिसमध्ये दाखल झाले. या संवादामुळे, अंतराळ, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान आणि आर्थिक सुरक्षा या क्षेत्रात दोन्ही देशांमधील सहकार्य अधिक दृढ होईल असं फ्रान्समधील भारतीय दूतावासानं समाज माध्यमांवरील एका संदेशांत म्हंटलं आहे.

भारत-युरोपियन संघ चर्चा

भारत आणि युरोपियन संघाची सातवी धोरणात्मक भागीदारी आढावा बैठक काल नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीत उभय देशांतील द्विपक्षीय भागीदारीच्या संपूर्ण पैलूंचा आणि संयुक्त व्यापक धोरणात्मक मुद्यांच्या अंमलबजावणीतील प्रगतीचा आढावा घेण्यात आला. परराष्ट्र मंत्रालयाच्या पश्चिम विभागाचे सचिव सिबी जॉर्ज आणि युरोपियन संघाचे भू-अर्थशास्त्र तसंच आंतरसंस्थात्मक विषयांचे उपमहासचिव मॅटी मासीकास यांनी या बैठकीचं सह-अध्यक्षपद भूषवलं.

कर्करोग औषध

कर्करोगावर वापरल्या जाणाऱ्या 137 औषधांच्या किंमती कमी करण्यात आल्या आहेत. या सुधारित किंमतींची अंमलबजावणी कालपासून लागू झाली आहे. राष्ट्रीय औषध मूल्य निर्धारण प्राधिकरणानं व्यापारी लाभाची मर्यादा निश्चित केल्यांनतर हे बदल करण्यात आले आहेत. आतापर्यंत एक हजारांहून अधिक कर्करोगविरोधी औषध प्रकारांच्या, सुधारित कमाल किरकोळ किंमती जाहीर करण्यात आल्या आहेत. कर्करोगावरील औषधांतील कपातीमुळे कर्करुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.

बुकर पारितोषिक

ब्रिटिश लेखक एम जॉन हॅरिसन यांना 2026 चं बुकर पारितोषिक जाहीर झालं आहे. 'द एंड ऑफ एव्हरीथिंग' या पुस्तकासाठी त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे. 60 वर्षांच्या लेखन कारकीर्दीनंतर प्रतिष्ठित साहित्यिक पुरस्कार जिंकणारे, 81 वरसीय हॅरिसन सर्वात वयस्कर लेखक ठरले आहेत.

दिवाळी डेस्क

आज कार्तिक शुद्ध प्रतिपदा अर्थात विक्रम संवत्सर पाडवा आहे. आजच्या दिवसाला बलिप्रतिपदा असंही म्हटलं जातं. आज विविध मंदिरांतून अन्नकूट-गोवर्धन पूजा करण्यात येते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या आवाहनानुसार राज्यातील मंत्री शेतकाऱ्यांबरोबर दिवाळी साजरी करत आहेत. उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे यांनी काल जालना जिल्ह्यातील मौजपुरी गावातल्या अंबादास तांगडे या शेतकऱ्याच्या घरी भेट दिली.

हज-यात्रेकरू करार

भारत आणि सौदी अरेबिया यांनी 2027 च्या हज यात्रेसाठी द्विपक्षीय करार केला आहे. या करारानुसार, 1 लाख 75 हजार 25 भारतीय नागरिकांना या वार्षिक तीर्थयात्रेसाठी जाण्याची परवानगी मिळणार आहे. केंद्रीय अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी काल जेद्दाह येथे सौदी अरेबियाचे हज आणि उमराह मंत्री तौफिक बिन फौजान अल-राबियाह यांच्याबरोबर झालेल्या द्विपक्षीय बैठकीत करारावर स्वाक्षरी केली. दोन्ही मंत्र्यांनी 'हज-2027' साठी सुरू असलेल्या तयारीचा आढावा घेऊंन द्विपक्षीय समन्वय अधिक बळकट करण्याबाबत चर्चा केली.

हवामान-शिखर परिषद

तुर्कीएमध्ये कालपासून 'कॉप 31' हवामान शिखर परिषदेला सुरुवात झाली. जागतिक पातळीवर हवामान बदलामुळे होणाऱ्या आव्हानांचा सामना करण्यासाठी सर्व देशांनी अधिक वेगानं आणि एकत्रितपणे प्रभावी पावलं उचलण्याचं आवाहन या परिषदेत जागतिक नेत्यांनी केलं. जग सध्या युद्धजन्य परिस्थिती, वाढती महागाई आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा वेगानं होणारा विस्तार अशा अनेक आव्हानांचा सामना करत आहे. मात्र, या सर्व परिस्थितीतही पृथ्वीचं संरक्षण करणं आणि हवामान बदल रोखणं याला सर्वोच्च प्राधान्य देण्याची गरज असल्याचं मत विविध देशांच्या नेत्यांनी व्यक्त केलं.

फटाके आदेश-ठाणे

दिवाळीत अनेक ठिकाणी फटाक्यांमुळे लागत असलेल्या घटनांची दखल घेत, सुरक्षिततेचा उपाय म्हणून मुंबईसह ठाणे जिल्ह्यात, हवेत उडणारे फटाके तसंच रॉकेट्स उडवण्याला मनाई करण्यात आली आहे. ठाण्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी हे आदेश जारी केले असून, पुढील तीन महिन्यांसाठी ते लागू राहणार आहेत.

येडशी आग-धाराशिव

महाराष्ट्रातल्या धाराशिव तालुक्यातील येडशी इथं रविवारी मध्यरात्री एका किराणा दुकान आणि घराला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातील सहा जणांचा मृत्यू झाला तर, एक जण जखमी झाला. या दुर्घटनेतून बचावलेल्या एकावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

नौका विहार

केंद्रीय जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या हस्ते आज नवी दिल्लीच्या यमुना नदीत मनोरंजनात्मक नदी नौकाविहार सेवेचा प्रारंभ होणार आहे. यमुना नदीवरील सोनिया विहार ते जगतपूर या पट्ट्यात ही सेवा उपलब्ध असणार आहे.

चारधाम-बंद

चारधाम मधील गंगोत्री धामचे दरवाजे हिवाळ्यानिमित्त आजपासून बंद करण्यात येणार आहेत. आज दुपारी अन्नकोट उत्सव झाल्यानंतर दरवाजे बंद करण्यात येतील. केदारनाथ आणि यमुनोत्री धामचे दरवाजे उद्या, तर बद्रीनाथ धामचे दरवाजे 16 नोव्हेंबरला बंद करण्यात येणार आहेत.

महिला क्रिकेट-संघनिवड

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ अर्थात बीसीसीआयच्या महिला निवड समितीने डिसेंबरमध्ये होणाऱ्या दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठी भारतीय संघाची काल घोषणा केली. या दौऱ्यात होणाऱ्या तीनही प्रकरच्या सामन्यांसाठी स्मृती मंधानाची कर्णधार म्हणून निवड करण्यात आली आहे. या दौऱ्यात भारतीय महिला संघ एक कसोटी, तीन एक दिवसीय आणि तीन टी-20 सामने खेळणार आहे. दौऱ्याची सुरुवात 9 डिसेंबरला गकेबरहा येथे कसोटी सामन्याने होईल.

क्रिकेट

भारत आणि न्यूझीलंड दरम्यान पुरुषांच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेतील तिसरा सामना आज हॅमिल्टन मध्ये सीडॅन पार्क इथं होणारा सामना पावसामुळे स्थगित करण्यात आला आहे. 5 सामन्यांच्या या मालिकेतील सुरवातीचे 2 सामने जिंकत भारतानं आपलं वर्चस्व राखलं आहे.

हवामान

भारतीय हवामान खात्यानं वर्तवलेल्या अंदाजानुसार, आज अंदमान आणि निकोबार बेटं, तामिळनाडू, पुद्दुचेरी आणि कराईकलमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तविला आहे. पुढील दोन दिवस बिहार, नागालँड, मणिपूर, त्रिपुरा आणि मिझोराममध्ये मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

नमस्कार.